संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# याकूब फासावर लटकेल तो दिवस खरा

मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातल्या प्रमुख आरोपी असलेल्यांपैकी याकूब मेमनला झालेल्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी ३१ जुलै ही तारीख नक्की झाल्याचे सरकारतर्फे सांगितले गेले. परंतु या शिक्षेला न्यायालयात आव्हान दिले गेले आहे. त्याचा निर्णय अद्याप यायचा आहे. आणि खरे तर त्या निर्णयावर या शिक्षेची अंमलबजावणी अवलंबून आहे. आता या शिक्षा प्रकरणावरून बरेच राजकारण आणि धर्मकारण केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अबू आझमी यांच्यासारख्या राजकीय नेत्याने याबद्दल आधीच फुत्कार काढून आपली जातकुळी दाखवून दिली आहे. खरे तर आज बॉम्बस्फोट खटला होऊन तीस-पंचवीस वर्षांचा कालावधी होऊन गेला आहे. ही सगळीच न्यायालयीन प्रक्रिया इतकी लांबली की, त्याला तसा काही अर्थ उरत नाही. मुंबईत झालेला बॉम्बस्फोट हा देशाविरुध्दचा सर्वात मोठा कट होता. आणि त्या खटल्याची सुनावणी इतक्या प्रदीर्घ काळ चालावी हादेखील जगातील विक्रम असू शकतो. भारतात लोकशाही व्यवस्था आहे. त्याच्या अंतर्गत न्यायालयीन व्यवस्था काम करीत असते. प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी दिली जाते. परंतु संधी देत असताना वेळेचा जो अपव्यय होतो त्याची तितक्याच गंभीरतेने दखल घेतली गेली पाहिजे. कारण याबाबत साक्षीपुरावे गोळा करण्यातच तपास यंत्रणांचा बराच कालावधी जातो. या सगळ्या गोष्टी गंभीरतेने लक्षात घेण्याची वेळ आलेली आहे. अन्य देशांमध्ये अशा प्रकारच्या खटल्यांसाठी एवढा वेळ दिला जात नाही आणि लागतही नाही. हा खटला मोठा होता, त्यामध्ये शंभरापेक्षा जास्त लोकांना अटक झाली होती. त्यासाठी स्वतंत्र टाडा न्यायालय स्थापन केले गेले. त्याअंतर्गत हा खटला चालला होता, परंतु एकाच खटल्यामध्ये शंभर आरोपी अडकले असताना केवळ या खटल्यासाठी स्वतंत्र न्यायालय स्थापन करणे गरजेचे होते. कारण प्रत्येकाला आपल्यावरच्या आरोपांविरुध्द थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाण्याची संधी दिली जाते. ती दिली गेली आणि नंतर बऱ्याच आरोपींची शिक्षा ही जन्मठेपेमध्ये परावर्तित झाली. त्यात याकूब मेमनसह दाऊद इब्राहीम आणि टायगर मेमन हे मास्टर माईंड असल्यामुळे त्यांना कठोर शिक्षा दिली जाणे अपेक्षितच होते. दाऊद इब्राहिम आणि टायगर मेमनला आपले सरकार भारतात आणू शकलेले नाही. आता केवळ याकूब मेमन हाताशी असल्यामुळे त्याला फाशी देण्याचा आदेश दिला गेला आहे. परंतु ज्या दिवशी तो प्रत्यक्ष फासावर चढेल, त्यादिवशी खऱ्या अर्थाने शिक्षेची अंमलबजावणी झाली असे म्हणता येईल.

## पाकिस्तानचे कटकारस्थान

आपल्याकडे गेली तीस चाळीस वर्षे दहशतवाद अक्षरशः नंगानाच घालतो आहे, काश्मीरमध्ये याच पाकिस्तानच्या मस्तीखोरपणामुळे फुटीरतावादीसुध्दा पाकिस्तानचे झेंडे फडकवून आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न करीत असतात. मुंबई बॉम्बस्फोट खटला जर योग्यवेळात पूर्ण झाला असता आणि त्यातल्या आरोपींना सुनावलेल्या शिक्षांची अंमलबजावणी तितक्याच वेगाने झाली असती, तर याच मुंबईवर २००८ साली दहशतवादी हल्ला झाला नसता. त्या २६/११ च्या हल्ल्यातही त्याच दाऊद इब्राहिमचा हात असल्याचे आढळून आले आहे. हा कट रचण्यामध्ये पाकिस्तानात राहून ज्या लख्वीचा आणि हाफिज सय्यदचा हात होता. त्यांना पाकिस्तान सरकारच संरक्षण देत आहे. यावरून भारतातला दहशतवाद हा कोणाच्या इशाऱ्यावर पोसला जातो हे स्पष्ट होते. आतादेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सार्क परिषदेसाठी पाकिस्तानला जाणार आहेत. यापूर्वीच पाकिस्तानकडून सीमेवर जमवाजमव सुरू झाली. शस्त्रसंधीचा भंग करून गोळीबार करण्याच्या घटना घडल्या. अशा प्रकारच्या कुरापती पाकिस्तानकडून कायमस्वरूपी चालू आहेत. याचा अर्थ असा होतो की, भारताला दहशतवादाच्या माध्यमातून पूर्णपणे जेरीस आणायचे आणि आपले महत्त्व वाढवत न्यायचे असा प्रकार पाकिस्तानकडून सुरू आहे. भारतात घडलेल्या कोणत्याही घटनेबद्दल विशेषतः दहशतवादी हल्ल्यांविरोधात कारवाई सुरू झाल्यानंतर पाकिस्तानने आणि तिथल्या दहशतवाद्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. जणूकाही भारतातला दहशतवाद संपूच द्यायचा नाही. असा निर्धार या देशाने केल्याचे दाखवून देण्याचे काम पाकिस्तान करीत असते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, पाकिस्तानपुरस्कृत या दहशतवादाला मदत करणारे अनेक हात भारतामध्ये मोकाटपणे फिरताना दिसतात. त्यांना जोपर्यंत जेरबंद केले जात नाही तोपर्यंत दहशतवादाचा नायनाट होऊ शकत नाही आणि यासाठी सरकारने वेगाने पावले उचलली पाहिजेत .सर्वात महत्त्वाचे म्हणजे यासंदर्भातल्या खटल्यांचे तातडीने निकाल लावून शिक्षांची अंमलबजावणी झाली पाहिजे.

## शिक्षांचा उलटा क्रम

यासंदर्भातले खटले जेवढे लांबत जातात तेवढा याच्याशी संबंधित देशद्रोह्यांचा असंतोष खदखदत राहतो. केवळ सुडाच्या भावनेतून पुन्हापुन्हा विविध भागामध्ये दहशतवादी हल्ले होत राहतात. २६/११चा हल्ला हा असाच पाकिस्तानने सुडाच्या भावनेतून रचलेला कट होता. त्यासाठी भारतातल्या काही स्थानिक लोकांची मदत घेतली गेली. याकूब मेमनला फाशीची शिक्षा झाली.त्याची अंमलबजावणी ठरल्याप्रमाणे जर ३१ जुलैला झाली, तर गेल्या पंचवीस वर्षांत दहा हजार बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांपैकी केवळ तिघांनाच फाशी दिले गेल्याचे दिसून येईल. २६/११तला अजमल कसाब याचाही खटला जवळजवळ तीन चार वर्षे चालला त्याला फाशी दिल्यानंतर त्याआधी संसदेवर झालेल्या हल्ल्यात आरोपी असलेल्या अफझल गुरुला नंतर फाशी दिले गेले. त्याहीपेक्षा आधी घडलेल्या मुंबई बॉम्बस्फोटातला प्रमुख आरोपी असलेल्या याकूब मेमनला फाशी दिली जाईल. ही क्रमवारी जर लक्षात घेतली, तर आपल्याकडे दहशतवादाबाबत किती दिरंगाईने कारवाया होतात किंवा उलट्या क्रमाने होतात हे सिध्द होते. खरे तर मुंबई बॉम्बस्फोटातल्या आरोपीनंतर संसदेवर हल्ला झालेल्यांना शिक्षा व्हायला हवी होती.आणि त्यानंतर अजमल कसाबचा हिशेब चुकता करायला हवा होता, परंतु सगळे उलट घडले. या क्रमवारीतून बरेच काही शिकण्यासारखे आहे. आणि दहशतवादाचे चक्र रोखायचे असेल तर खटले चालवण्याची प्रक्रिया गतीमान केल्याशिवाय दुसरा पर्याय राहात नाही.